# सरिता पदकी - अल्प परिचय




सरिता पदकी (माहेरच्या शांता  कुलकर्णी) यांचा जन्म १३ डिसेंबर १९२८ रोजी झाला. वडील गणेश महादेव कुलकर्णी ठाणे जिल्ह्यात शाळामास्तर होते. मुलीला उत्तम शिक्षण देणे त्यांनी महत्वाचे मानले होते. सरिता पदकींनी पुण्यात एम. ए. (संस्कृत) पर्यंत शिक्षण घेतले. १९५२ साली लेखक मंगेश पदकी यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या.

कविता, ललित लेखन, बालसाहित्य, नाटक, कथा असे साहित्याचे निरनिराळे प्रकार त्यांनी सहज हाताळले .
'लगन -गांधार', अंगणात माझ्या', 'चैत्रपुष्प' हे काव्यसंग्रह, 'बारा रामाचं देऊळ' आणि 'घुस्मट' या कथासंग्रहांचे रसिकांनी स्वागत केले.
'बाधा', 'खून पाहावा करून', 'सीता' ही त्यांची नाटकेही लक्षणीय ठरली .
त्यांनी अनुवादित केलेले करोलीना मारिया डी जीझस यांच्या 'चाइल्ड ऑफ डार्क' यांचे आत्मनिवेदन ('काळोखाची लेक') गाजले आणि त्याचे अनेक प्रयोगही केले गेले.
यूजीन ओनील यांचे नाटक ('पांथस्थ'), वेस्टिंग हाउसचे चरित्र ('संशोधक जादूगार'), गांधीजींच्या जीवनाचे अखेरचे पर्व (निर्मल कुमार बोस),  "हाउंड ऑफ द बास्करव्हिल्स" (शेरलॉक  होम्स कथा)  हे त्यांचे अनुवाद लक्षणीय ठरले. 'सात रंगांची कमान माझ्या पापण्यांवर' हा जपानी भाषेतील काव्याचा अनुवादही त्यांनी केला.

सरिता पद्कींनी मुलांच्या साहित्यावर प्रचंड प्रेम केले. 'गुटर्र गूं गुटर्र गूं' आणि 'नाच पोरी नाच' 'छोटू हत्तीची गोष्ट', 'गर्गुश्का', 'सुळूक' हे बालकवितासंग्रह आणि 'जंमत टंपूटिल्लूची' हा कथासंग्रह त्यांनी लिहिला आहे."रानवारा", तसेच "बाल-साधना" या मुलांच्या नियतकालिकाचे संपादन आणि त्यासाठी बरेच लेखन त्यांनी केले आहे.

अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले गेले. त्यात :
राज्य पुरस्कार: 'बाधा', 'गुटर्गू', 'नाच पोरी नाच', 'बारा रामांचं देऊळ', चैत्र-पुष्प केंद्रीय पुरस्कार: 'जम्मत टंपू -टिल्लू ची'
अनुवाद पुरस्कार: 'काळोखाची लेख'
बालवाङ्मया साठी शिरोळे, तसेच मालतीबाई दांडेकर पुरस्कार पुणे नगर वाचनालयातर्फे सत्कार हे येतात.
'बालवाङ्मय संमेलन नगर, कोथरूड साहित्य संमेलन यांचे त्यांनी अध्यक्ष पद भूषविले.
पुण्याच्या साहित्य संमेलनात त्यांना "जीवन गौरव" पुरस्कार देण्यात आला .
साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या त्या एक संस्थापक व अध्यक्ष होत्या.

स्त्रियांच्या आणि मुलांच्या सामाजिक प्रश्नात त्यांना खूप रस असे. अंध शाळेतील, अनाथ आश्रमातील, तसेच पुण्यातील "निहार" या वेश्यांच्या मुलांसाठीच्या वसतिगृहातील मुलांच्या कार्यक्रमात त्या जात, तेथे गोष्टी सांगत. "निगराणी" या कोथरूडच्या मुलांसाठी चालविलेल्या "पूरक" शाळेच्या त्या काही काळ अध्यक्ष होत्या.

आयुष्याच्या अखेरपर्यंत त्या लिहित राहिल्या. वयाच्या ७८ व्या वर्षी त्यांनी संगणकावर इमेल, वेब साईट यांचे ज्ञान करून घेतले  व त्या दिवसभर त्यात मग्न असत. ३ जानेवारी २०१५ रोजी अमेरिकेत त्यांचे निधन झाले.

एक सिद्धहस्त, बुद्धिमान आणि सामाजिक दृष्ट्या अतिशय जागृत लेखिका-कवियत्री म्हणून त्या मराठी जनांच्या कायम स्मरणात राहतील .

**- मिलिंद पदकी**